# <u>वर्धा जिल्ह्यातील ३७ रेती घाटाची पर्यावरण विषयक लोकजनसुनावणीचे इतिवृत्त दि.१०/०६/२०२०.</u>

जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, ता. व जि.वर्धा यांनी वर्धा जिल्हयातील एकुण ३७ रेतीघाट आष्टी तालुक्यातील चिंचोली (०.४२ हेक्टर), इस्माईलपूर (०.३५ हेक्टर), नवाबपूर (०.४५ हेक्टर), तालुका आर्वी येथील सालफळ (३.५० हेक्टर), साईखेडा (२.७० हेक्टर), दिघी-वडगांव-२ (१.८० -हेक्टर), तालुका देवळी येथील आपटी -१ (१.०६ हेक्टर), तांभा-१ (१.२२ हेक्टर), हिवरा (का)-१ (१.५० हेक्टर), टाकळी (चना-१) (१.२२ हेक्टर), सोनेगांव-बाई (१.२० हेक्टर), टाकळी (दरणे) (०.९९ हेक्टर), बोरगांव-आ (०.१८ हेक्टर), तालुका हिंगणघाट येथील जुनोना व बोरगांव(दा) (४.९० हेक्टर), चिकमोह (४.२० हेक्टर), टेंभा -पारडी (न.) (४.८० हेक्टर), घाटसावली व चिंचोली (४.९० हेक्टर), खारडी-भारडी (२.८० हेक्टर), काजळसरा (१.३६ हेक्टर), गणेशपूर-बोरखेडी (१.८० हेक्टर), भगवा-२ (०.६२ हेक्टर), भगवा-१ (०.७० हेक्टर), येळी (२.४५ हेक्टर), शेकापूर(बाई) (१.६० हेक्टर), कुरण (रिठ) (१.१६ हेक्टर), नांद्रा(रिठ) (३.१५ हेक्टर), तालुका समुद्रपूर खुनी+वंदली+सेवा (२) (२.८७ हेक्टर), मांडगांव-१ (२.५० हेक्टर), मांडगांव-२ (३.० हेक्टर), मनगांव (१.८० हेक्टर), बरबडी (१.५० हेक्टर), वाकसूर (२.१० हेक्टर), खुनी (१.९५ हेक्टर), उमरा+औरंगपूर(रिठ) (२.९२ हेक्टर), औरंगपूर(रिठ)+उमरा (२.५० हेक्टर), चाकुर (१.५० हेक्टर), पारडी (२.२५ हेक्टर) प्रस्तावित रेतीघाटाची लोकसुनावणी घेण्याबाबत अर्ज प्राप्त झाले. त्यानुसार वर्धा जिल्ह्यातील ३७ प्रस्तावित रेतीघाटाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दिनांक १०/०६/२०२० रोजी दुपारी १२.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, जि.वर्धा येथुन झुमॲपद्वारे श्री.विवेक भिमनवार, जिल्हाधिकारी, वर्धा यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्री.अशोक करे, प्रादेशिक अधिकारी, नागपूर हे म.प्र.नि.मंडळाचे प्रतिनिधी तथा लोक सुनावणी समितीचे सदस्य होते व श्री.आनंद काटोले, उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-२ यांनी समन्वयक म्हणून काम केले. पर्यावरण विषयक लोक सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या लोकांच्या नावांची यादी सोबत जोडले आहे. **(सहपत्र-१).**

## <u>पार्श्वभूमी</u>

मा.जिल्हाधिकारी, वर्धा यांनी रेती/वाळू निर्गमीतीचे धोरण दि. ०३.०९.२०१९ नुसार ३७ रेती घाट उत्खननासाइी प्रस्तावित केलेले असून जिल्हा खनिकर्म अधिकारी, वर्धा यांना विविध अनुमती घेणेकरिता प्रकल्प प्रवर्तक म्हणून नेमलेले आहे. सदर ३७ रेती घाट तालुकास्तरावर मा.तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीस भुवैज्ञानिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ यांचे प्रतिनिधी, जलसंधारण विभागाचे प्रतिनिधी असलेल्या तालुका तांत्रिक समितीद्वारे ओपन कास्ट पध्दतीने म्हणजेच पारंपारिक पध्दतीने (घमेले, पावडे यांच्या साहाय्याने) उत्खनन करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. पर्यावरण विभागाच्या पत्र क्र.SEAC/२०१९ प्र.क्र.१/ता.क्र.३ दिनांक ०४/०५/२०२० नुसार सदर लोकसुनावणी ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आलेली आहे.

## प्रयोजन व कार्यपध्दती

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-२ यांनी अध्यक्षांच्या परवानगीने अध्यक्ष, लोकसुनावणीचे समितीचे सदस्य व उपस्थितांचे स्वागत करून लोकसुनावणीला सुरवात केली.

सर्वप्रथम मा. जिल्हाधिकारी, वर्धा व अध्यक्ष, जन सुनावणी समिती यांनी जाहिर लोकसुनावणी घेण्याबाबतचा उद्देश व त्याची कार्यपध्दती समजावून सांगितली. त्यानुसार या ठिकाणी परवानगी बाबतचा कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही असे स्पष्ट केले. या जाहिर लोक सुनावणीमध्ये घेण्यात येणाऱ्या आक्षेपांची नोंद घेणे व शासनास पाठविणे एवढेच काम ही समिती करेल. त्यामुळे उपस्थित जनतेला या प्रकल्पाबाबत त्यांच्या सूचना, टिका, टिप्पणी, निवेदने व आक्षेप घ्यावयाचे असतील तर या ठिकाणी तोंडी मांडावयाचे आहेत त्याची नोंद घेतली जाईल व शासनास पाठविण्यात येईल असे सांगितले.

..२/-

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-२ यांनी भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसूचना दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारीत अधिनियम दि. ०१/१२/२००९ नुसार लोकसुनावणी घेण्याचे प्रयोजन विशद आहे. तसेच त्यामधील तरतुदीनुसार दिनांक ०९/०५/२०२० ला दैनिक हितवाद (इंग्रजी) व दैनिक नवराष्ट्र (मराठी) या दोन मोठ्या प्रमाणात वितरीत होत असलेल्या स्थानिक वृत्तपत्रात या पर्यावरण विषयक लोकसुनावणीबद्दल जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आल्या. दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या सुचनांच्या वृत्तपत्र कात्रणाची प्रत सोबत जोडली आहे. **(सहपत्र-२).**

भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसुचने प्रमाणे प्रकल्पाची ठळक वैशिष्ठे असलेल्या, पर्यावरण आघात मुल्यनिर्धारण अहवालाच्या संक्षिप्त विवरणाची प्रत व इतर माहिती असलेले कागदपत्रे (इंग्रजी व मराठी मध्ये) विविध सरकारी कार्यालयात तसेच ग्रामपंचायत कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले होते. जाहिर सूचना प्रसिध्द झाल्यापासून जाहिर सुनावणीच्या तारखेपुर्वी परिसरातील लोकांकडून लिखीत स्वरूपात सूचना, टीका-टिप्पणी व आक्षेप मागविण्यात आलेले हाते. जाहीर लोकसुनावणीच्या दिवसापर्यंत कोणतीही तक्रार वा आक्षेप म.प्र.नि.मंडळाकडे प्राप्त झाले नाही. तदनुसार, मंडळाचा आदेश क्र. ई-२०/२०२० पत्र क्र. BO/JD/(WPC)/PH/B-458 dtd. 26/05/2020 नुसार लोक सुनावणी समिती गठीत करण्यात आली. या आदेशाची प्रत सोबत जोडत आहे. **(सहपत्र-३).**

तद्नंतर उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-२ तथा समन्वयक यांनी प्रकल्पधारकाला प्रकल्पाबद्दल व पर्यावरणीय अहवालाबाबत विस्तृत सादरीकरण करण्यास सांगितले. तदनुसार, प्रकल्प धारकाच्या प्रतिनिधीने तपशिलवार स्थानिक भाषेत वर्धा जिल्ह्यातील ३७ रेतीघाटाचे सादरीकरण केले. सादरीकरण झाल्यावर उपस्थित नागरीकांना आपले अभिप्राय, सूचना, आक्षेप नोंदविण्याकरीता आव्हान करण्यात आले. मप्रनि मंडळाकडे लेखी स्वरूपात श्री.सुधीर पालीवाल, श्री.प्रसाद खाले व श्रीमती चंद्रकला ढाणके यांचे आक्षेप प्राप्त झाले आहे. त्यानुसार खालील नमुद नागरीकांनी ऑनलाईन पध्दतीने आपले अभिप्राय व्यक्त केले.

<u>कार्यवृत्त :</u>

१. **प्रा.अरविंद सोनी.**
   - शासन निर्देशानुसार रेती वाहतुक करणाऱ्या ट्रक/वाहनाला जिपीस (GPS) प्रणाली लावले आहेत किंवा कसे. असतील तर संबंधित माहिती कुठे संकलित केल्या जाते. त्याचप्रमाणे दोषी वाहन धारकांवर कार्यवाही करण्यात येते कां. तसेच कार्यवाही किती कालावधीमध्ये करण्यात येते.
   - प्रत्येक रेती घाटावर सीसीटिव्ही कॅमेरे लावण्यात आले आहे काय.
   - सामान्य व्यक्ती रेती चोरीची तक्रार करण्यास घाबरतो. त्यामुळे रेती चोरीच्या तक्रारीबाबत टोल फ्री नंबर देण्यात यावा. त्याचप्रमाणे तक्रारदाराचे नांव सार्वजनिक करू नये. त्यामुळे रेती चोरीस वचक बसविणे शक्य होईल व शासनाचा महसुल बुडणार नाही.

२. **श्री. सुनंदा रेड्डी. पर्यावरण तज्ञ.**
   - यांनी रेती घाटास समर्थन दशविले. त्याचप्रमाणे नदयांमधील रेती वेळोवेळी उपसा झाल्यास नदीप्रवाह सुरळीत राहुन पुर परिस्थिती टाळण्यास मदत होईल, असे सुचविले.

३. **श्री.गजानन टेले, घाटसावली.**

- यांनी रेती चोरीच्या तक्रारीकरीता टोल फ्री नंबर आवश्यक असण्यास समर्थन दर्शविले. त्याचप्रमाणे घाटसावली रेती घाटाचा लिलाव अद्यापपावेतो कां झाला नाही?

४. **श्री.आशिष गोसावी.**

- रेती ट्रक/वाहनाची २४ तास वाहतुक होते. त्यामुळे कॉलोनी मधील लोकांना त्रास होतो. यावर तक्रार करूनही कार्यवाही होत नाही.

५. **श्री. जगु वानखेडे.**

- रेती वाहतुकीमुळे ग्रामपंचायत बोरगांव-दाताळ मधुन जाणार पक्का रस्ता खराब होण्याची शक्यता असुन रेती वाहतुकीकरीता पर्यायी कच्चा रस्ता हा गावांबाहेरून करून देण्यात यावा. जेणेकरून गावांमधील रस्त्याची पावसाळ्यामध्ये दुरावस्था होणार नाही.

६. **श्री. मुन्ना सिद्दिकी, पुलगांव.**

- इतर जिल्ह्यात तुलनेत वर्धा जिल्ह्यात रेतीला रू.४०००/- प्रती ब्रास एवढा भाव असुन हा जास्त व न परवडणारा आहे.

७. **श्री. किशोर दिघे.**

- रेती घाटातुन होणाऱ्या वाहतुकीमुळे लगतच्या गावांतील रस्त्यांची दुरावस्था होते. परंतु प्रशासनाकडुन किंवा घाटधारकाकडुन रस्त्यांचे नुतनीकरण किंवा डागडुजी केली जात नाही. त्यामुळे घाट लिलाव करतांना संबंधित गावांतील रस्त्यांचे नुतनीकरण किंवा डागडुजी करण्याच्या अटी व शर्तीवरच घाट धारकांना घाट देण्यात यावा.

**प्रकल्प प्रस्तावक :**

- शासन निर्देशानुसार रेती वाहतुक करणाऱ्या ट्रक/वाहनाला जिपीस प्रणाली लावलेले असतात. तसेच त्यासंबंधिचा सर्व माहिती ही त्या विभागातील तहसिल कार्यालयाकडे जतन केली जाते. त्याचप्रमाणे नियमाचे पालन न करणाऱ्या रेती वाहन धारकांवर नियमाप्रमाणे वेळोवेळी कार्यवाही करण्यात येत

- प्रत्येक रेती घाटावर सीसीटिव्ही कॅमेरे लावण्याबाबत घाटाचा लिलाव झाल्यानंतर कार्यवाही करण्यात येईल.

- टोल फ्री क्रमांकाबाबत सविस्तर विचार करून निर्णय घेण्यात येईल.

- घाटसावली रेती घाट पर्यावरण विषयक संमती मिळाल्यानंतर लिलावाकरीता ठेवण्यात येईल.

- रेती वाहतुकीच्या तक्रारीवर वेळोवेळी कार्यवाही करण्यात येते. तसेच यापुढेही तक्रार प्राप्त झाल्यास नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

- महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग यांच्या दि. ०३/०९/२०१९ च्या शासन निर्णयाप्रमाणे जिल्ह्यामध्ये गतवर्षी/मागील वेळेच्या लिलावामध्ये प्राप्त झालेली सर्वोच्च बोली व लिलावात मंजुर एकुण वाळु साठा यानुसार प्रती ब्रास किंवा यथास्थिती प्रती मे.टन रक्कम परिगणित करून त्यात प्रतीवर्षी ६ टक्के दराने वाढ करावी व सदर अद्यावत प्रती ब्रास किंवा यथास्थिती प्रती मे.टन रकमेचा व संबंधित वाळु घाटातील अंदाजीत वाळु साठाचा गुणाकार केल्यानंतर येणारी रक्कम अशा वाळु गटाची हातची किंमत म्हणुन निश्चित करण्यात येते.

- लगतच्या गावामधील रस्त्यांची सुव्यवस्था व देखभाल याबाबत रेतीघाट लिलावानंतर रेतीघाट धारकास मार्गदर्शनपर सुचना देण्यात येतील.

वर्धा जिल्ह्यातील ३७ प्रस्तावित रेतीघाट करीता जाहिरात/सूचना कालावधीत प्राप्त आक्षेपांची माहिती सोबत जोडण्यात येत आहे. **(सहपत्र-४)**.

मा.जिल्हाधिकारी, वर्धा यांनी सदर प्रकल्पाबाबत उपस्थित नागरिकांना कळविले की, नागरीकांनी मांडलेल्या अभिप्राय व सूचना याची दखल घेण्यात येईल. त्यानंतर उपस्थित केलेल्या प्रश्नांची व प्रकल्प प्रस्तावकांच्या उत्तराची उजळणी करण्यात आली व वर्धा जिल्ह्यातील ३७ रेती घाटाबाबत झुमॲपवर उपस्थित जन समुदायाने शांतपणे आपले निवेदने मांडली व उपस्थित केलेल्या मुद्दयांची तंतोतंत इतिवृत्तात नोंद घेण्यात आली, असे कळविले. जन सुनावणी समितीचे अध्यक्षांनी जनसुनावणीचा समारोप केला. समन्वयक श्री. आनंद काटोले यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. तसेच प्रकल्प प्रस्तावकाचे प्रतिनिधी यांनी सर्वांचे आभार मानले, माननीय अध्यक्ष यांचे परवानगीने ही जाहिर लोकसुनावणी संपली असे जाहिर करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| **(आनंद काटोले)**<br>**उप-प्रादेशिक अधिकारी-२, म.प्र.नि.मंडळ, नागपूर व समन्वयक, लोक सुनावणी समिती** | **(अशोक करे)**<br>**प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर व सदस्य, लोक सुनावणी समिती** | **(विवेक भिमनवार, भाप्रसे)**<br>**जिल्हाधिकारी, वर्धा व अध्यक्ष, लोक सुनावणी समिती** |